# प्रकरण पहिले
# ना. घ. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण


०१. प्रास्ताविक

१.१ बालपण

१.२ शिक्षण

१.३ विवाहपूर्व जीवन

१.४ परिसर प्रभाव

१.५ सांसारिक जीवन

१.६ वाङ्मयीन जडणघडण

समारोप

संदर्भ ग्रंथ

# प्रकरण पहिले
# ना. घ. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण

## ०१. प्रास्ताविक :

ना. घ. देशपांडे हे विदर्भातील लोकप्रिय ज्येष्ठ कवी व चिकीत्सक अभ्यासक होत. त्याचबरोबर ते काव्यप्रेमी रसिक सुध्दा होते. आपल्या ९१ वर्षाच्या आयुष्यात साठ वर्षेपर्यंत सतत काव्यलेखन करून मराठी काव्याच्या समृद्धीत अधिकाधिक भर घातली. त्यांचे काव्य चालीवर म्हणता येईल असे असल्याने त्यांच्या काव्याची अनेक ध्वनिमुद्रणे तयार होऊन त्यातून कवी ना. घ. देशपांडे यांना खूप लोकप्रियता मिळाली.

कवयित्री शांता शेळके 'फुले आणि काटे' या ना. घं. च्या आत्मकथनात्मक पुस्तकाच्या प्रस्तावनेत या कवीबाबत म्हणतात. ''नव्या जुन्या सर्व काव्यप्रेमी रसिकांना इतका दीर्घकाळ आणि इतक्या निरपवादपणे आवडलेला ना. घ. देशपांडे यांच्या सारखा दुसरा कवी मराठीत दाखवून देणे अवघड आहे.''[१] ना. घ. देशपांडे यांच्या काव्य-लेखनकाळात विविध प्रकारची परिवर्तने मराठी काव्यात आली. परंतु या कवीची कविता मात्र आपल्याच एका निश्चित वाटेने चालत राहिली. आपल्याच तालात गात राहिली. तिच्यातील मूळ स्थितीत फारसा बदल झाला नाही. अशाप्रकारे भावसंपन्न आणि दीर्घकविता लिहून मराठी काव्यविश्वात आपले वेगळे स्थान निर्माण करणारे ना. घ. देशपांडे हे एक महत्त्वाचे कवी होत. अशा या ज्येष्ठ कवीच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण कशी झाली हे पुढील भागात पाहिले आहे.

## १.१ बालपण :

ना. घ. देशपांडे यांचा जन्म दि. २१-०८-१९०९ ला सकाळी आपल्या आजोळच्या गावी सेंदूरजन, ता. मेहकर (आता ता. सिंदखेडराजा) येथे नागपंचमीच्या दिवशी झाला. त्यांचे पूर्ण नाव नागोराव घनश्याम देशपांडे असे होते. 'खूणगाठी' या आपल्या काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत त्यांनी स्वत:बद्दल विस्तृत माहिती दिली आहे. आपल्या जन्मकुंडली बाबत सांगताना ते म्हणतात -

''माझ्या जन्मलग्न कुंडलीत शुक्र जन्मलग्नांशतच आहे. तो नवमेश आहे. षड्वर्गबलीही आहे. कन्या राशीत असला तरी केंद्रात असल्याने नीचत्वभंग झालेला आहे. कन्येचा शुक्र कै. अत्रे, गटे, तांबे, बालकवी, देवल यांच्याही कुंडल्यांत दिसतो. शुक्र लग्नांशात असल्याने आपल्यात कवित्वाची जन्मजात प्रवृत्ती असावी. तो नवमेश ही असल्याने पित्याकडून ही ती उत्पन्न झाली असे दिसते.''[२] यावरून आपल्यात जन्मजात कवित्वाची प्रवृत्ती असल्याचे ते सांगतात. त्यांच्या कुंडलीवर जरी आपण विश्वास ठेवला नाही तरी त्यातून त्यांचा आत्मविश्वास जाणवतो असे आपणास दिसून येते.

ना. घ. देशपांडे यांच्या वडिलांचे गाव 'साखरखेर्डा' ता. मेहेकर हे होय. ''साखरखेर्ड्याला 'फत्तेखेर्डा', 'खेर्डा', खेडुले अशीही नावे आहेत. १८२४ मध्ये मोगल व निजाम यांच्यात लढाई झाली होती. पहिले बाजीराव पेशवे निजामाच्या बाजूने लढाई लढत होते. निजामाची या लढाईत 'फत्ते' (विजय) झाली. त्यांनी या गावचे नाव 'फत्तेखेर्डा' ठेवले होते.''[३] अशाप्रकारचा जुना संदर्भ या गावला प्राप्त आहे. याच फत्तेखेर्ड्याला साखरखेर्डा देखील म्हणत. ना. घं. चे वडील घनश्यामपंत हे साखरखेर्डा परगण्याचे देशपांडे होते. सावरकरी परंपरेचे व रामदासी संप्रदायाचे ही होते. त्यांना धार्मिक गोष्टींची आवड होती. 'खेर्डा' हे लेखकाचे गाव असले तरी त्यांचे बालपण मात्र त्यांच्या आजोळी म्हणजे खेर्ड्याहून दक्षिणेला पाच मैलांवर 'सेंदूरजन' या छोट्याशा गावी गेले.

'ना. घं.' वयाच्या दीड वर्षापासून आजोळच्या गावी सेंदूरजनला राहत होते. आजोळचा उंच असा वाडा होता. त्या वाड्याला चौकांनीच उजेड व हँवा मिळायची. वाड्याच्या बाहेरच्या बाजूला खालच्या मजल्याला कुठेच खिडकी नव्हती. एकूणच वाड्याभोवती बंदिस्तपणा होता. ना. घं. चे आजोबा व्यंकटेश देशमुख हे गावातील सधन व सत्ताधारी वतनदार होते. सकाळी शाळेसाठी व संध्याकाळी, क्वचित दुपारी शेतात व मळ्यात जाण्यासाठी बाहेर जायला मिळे.

ना. घ. देशपांडे यांची लहानपणीची वृत्ती ही आळशी होती. काही तरी डोक्यात धरून त्याचीच चिंता, चिंतन करण्याची वृत्ती त्यांना बालपणापासून होती. प्रातर्विधी देखील ते दोन-

दोन दिवस टाळत असत. आजोबा रागावले तर वेळ मारून न्यायची व आजीचा त्यावेळी आधार घ्यायचा असे चालले होते. घरात लेखकाला सोबत खेळण्यासाठी त्यांच्याच वयाची मामेबहिण विमलबाई होती. त्याच्या मामाला मुलगा वगैरे नसल्याने हे दोघेच घरात सर्वांची लाडकी बनली होती. आपल्या आळशी वृत्तीमुळे व ती वृत्ती आजोळला चालत असल्यामुळे ना. घं. ना साखरखेर्ड्यापेक्षा शेंदूरजन आवडायचे. त्यांची आई अधून मधून खेर्ड्याहून त्यांना भेटायला येई. ना. घं. आपल्या आईला 'ताई' म्हणत असत. आई खेर्ड्याला व ते शेंदूरजनला राहत असल्यामुळे त्यांना आईविषयी अधिक ओढ असणे साहजिकच होते. त्यांना आईविषयी अपार प्रेम होते. अशातच काळाने त्यांच्यावर घात केला. ना. घं. हे नऊ वर्षांचेच असतांना १९१८ साली त्यांची आई खेर्ड्याला मरण पावली. ना. घं. व त्यांचे लहान भाऊ विष्णु, त्रिंबक, उद्धव हे आईच्या प्रेमाला पारखे झाले.

ना. घ. देशपांडे यांचे वडील स्वभावाने सद्गृहस्थ होते. त्यांना धार्मिक काव्यरचना, आरतीची आवड होती. ते ना. घं. ना कविता करण्यास प्रेरणा देत. जेव्हा ना. घं. कविता लिहित तेव्हा त्यांचे वडील राधा-कृष्णाच्या शृंगारावर कविता लेखन करण्यास सांगत. एकूणच त्यांचे बालपण हे आजोळच्या गावी खेळीमेळीत जात होते. त्याचप्रमाणे त्यांना आई-वडिलांविषयी आदर व ओढ असलेली दिसते. आपण स्वत: लहानपणी हाडकुळे शरीरांचे होतो याचा ते स्वत:हून उल्लेख करतांना दिसतात.

## १.२ शिक्षण :

कवी ना. घ. देशपांडे लहानपणी आपल्या आजोळी शेंदूरजनला राहत असल्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण आजोळीच झाले. १९२० ला सेंदूरजनला ते मराठी चौथी पास झाले. यानंतरचे पुढचे शिक्षण कोठे ? असा प्रश्न पडला होता. त्यावेळेला त्यांच्या वडिलांना वाटत होते की, पुढील शिक्षण ना. घं. नी खामगांवला आपल्या भावाजवळ घ्यावे. खामगांवला आपल्या काकांजवळ राहून ना. घं. शिक्षण घेतच होते. परंतु आजोळच्या आजीला ना. घं. ना चिखली (मेहेकर) ला पाठवायचे होते. कदाचित ना. घं. च्या काकांचे त्यांच्यावर दुर्लक्ष होईल.

असे तिला वाटले असावे. इयत्ता ५ वी ते ८ वी अशी चार वर्षे इंग्रजी शिक्षणासाठी त्यांना मेहेकरला काढावी लागली. याच काळात 'सरकारी शाळा सोडा' असा आग्रह राष्ट्रीय चळवळीने केला. तेव्हा ना. घं. च्या मामांनी इतरांनी व ना. घं. नी देखील सरकारी शाळा सोडून राष्ट्रीय शाळेत दाखल झाले. तेथे शिक्षणाचा दर्जा उच्च असल्याने त्याचा चांगला परिणाम कवीच्या शैक्षणिक गुणवत्तेवर झाला. तेथे त्यांना शेकडा ९० गुण मिळत होते. त्यातून त्यांनी शिक्षकांची आपुलकी मिळविली. अभ्यास करीत करीत हायस्कूल एट्रन्स परीक्षेत त्यांनी स्कॉलरशिप मिळविली. राष्ट्रीय शाळेत आखाड्यात जावे लागत असे परंतु कवीला तेथे जाण्याचा कंटाळा यायचा पण नाईलाज होता. त्यांचे अभ्यासापेक्षाही देवधर्माकडे जास्त लक्ष असायचे. देवभक्तीनेच आपण पास होऊ असे त्यांना वाटे. त्यांची बालसुलभ अशी वृत्ती येथे स्पष्ट होते. इयत्ता आठवी समाप्त झाल्यावर वडिलांच्या मदतीने तीन-चार वर्षे शिकायला आपल्या काकांकडे खामगांवला आले. त्यांनी तेथील शिक्षण अडचणीत पूर्ण केले. १९२७ पासून १९३४ पर्यंत नागपूरला मॉरिस कॉलेजमध्ये ना. घं. शिकायला आले. तेथे आपल्या नवनवीन मित्रांबरोबर ते समरस झाले. येथेच वास्तव्यास असताना त्यांच्या 'शीळ' (१९२९) ह्या पहिल्या कवितेने जन्म घेतला.

खामगांवला हायस्कूल मध्ये शिकत असताना बालकवी केशवसुत, गोविंदाग्रज, यशवंत, गिरीश, माधव ज्युनियन, अनिल यांच्या कविता त्यांना वाचायला मिळायच्या व त्यामुळे त्यांच्या मनाची ओढ काव्याकडे झुकली. त्याचप्रमाणे नागपूरला शिक्षण घेत असताना त्यांच्या वाचनात ग्रे, टेनिसन, कोलरिज, टी.एस. इलियट यांच्या कविता आल्या त्याचाच परिणाम त्यांच्या मनावर झाला व त्यातून त्यांची कविता विकसत होत गेली. त्यांना गणित या विषयाची आवड होती म्हणून त्यांनी प्रथमत: 'बी.एस्सी' कडे प्रवेश घेतला पण नंतर आपली ओढ साहित्याकडे असल्याचे जाणून त्यांनी बी.ए. ला पुन्हा प्रवेश घेतला. बी.ए. ला त्यांनी इंग्रजी वाङ्मय, तत्त्वज्ञान याबरोबरच गणितही घेतले होते. त्यांचे मामा त्यांना इंजिनिअरिंगसाठी अमेरिकेला पाठवणार होते. म्हणून त्यांना इंजिनिअरिंगची भुरळ पडायची. नंतर त्यांनी फायरिंगमध्ये पाच ही 'बुल्स ऑईज' घेतले. त्यातून त्यांना लष्करात जाण्याची इच्छा झाली तर

कधी राजकारणी व्हावसे वाटले तर कधी त्यांना तत्त्वज्ञानी व्हावेसे वाटले म्हणून त्यांनी डॉ. राधाकृष्णन् यांचे 'हिस्टरी ऑफ इंडीयन फिलॉसफी' वाचून काढले. त्यासाठी त्यांनी एम.ए. चा कोर्स देखील घेतला होता. परंतु तीनवेळा विषमज्वर झाल्यामुळे त्यांना तो कोर्स सोडावा लागला. या दरम्यान गॅसेसचा तीव्र विकार त्यांना जडला. त्यामुळे त्यांना सर्व काही सोडावे लागले. मात्र काव्यलेखनापासून ते तसूभर ही दूर गेले नाहीत. काव्यलेखन करता यावे म्हणून त्यांनी वकिलीचा व्यवसाय स्वीकारला. त्याबाबत सांगताना ते 'खूणगाठी' च्या प्रस्तावनेत म्हणतात -

''कवीला स्वतंत्रपणे जगता यावे यासाठी ॲडव्होकेटचा धंदा केला, कायद्यात रस वाटत होता; प्रथम श्रेणीत एल्.एल्.बी. झालो होतो; पण हा वकिलीचा धंदा कवितेसाठीच केला व करत आहे. माझे मन सर्वस्वी कविताकेंद्रीत आहे.''[४] यातून त्यांचे कविमन व कवितेविषयीची असलेली आत्यंतिक ओढ आपल्याला पाहायला मिळते. अशाप्रकारे बालपणापासून ते वकिली पर्यंतच त्यांचा प्रवास दिसून येतो.

## १.३ विवाहपूर्व जीवन :

ना. घं. हे लहानपणापासून आपल्या आजोळच्या गावी राहत होते. त्यामुळे ते तेथचेच बनून गेले होते.लहानपणी ते व त्यांच्या मामेबहिण विमलबाई हे दोघेच घरांत लहान असल्यामुळे ते सर्वांचे लाडके बनले होते. ना. घं. आजोळी खूप आळशीपणा करायचे त्या आळशीपणातूनच त्यांना चिंतनाची सवय लागल्याचे ते सांगतात व या सखोल चिंतनातून आपल्या काव्याचा उगम झाला असे ते मानतात. १९१८ ला त्यांची आई मरण पावली तेव्हा त्यांच्या घरातल्यांनी व त्यांनी रितीरिवाजानुसार सर्व कार्यक्रम आटोपला ना. घं. व त्यांचे लहान भाऊ येथून आईच्या प्रेमाला पारखे झाले. त्यांना आईची कमतरता अतोनात भासत राहिली.

पुढच्या काळात शेंदूरजन, मेहेकर, खामगांव नंतर नागपूरला त्यांनी शिक्षण घेत शेवटी व्यवसाय म्हणून वकिलीचा मार्ग स्वीकारला. कविता करण्याचा छंद त्यांना लहानपणापासूनच होता. त्यांचे वडील आध्यात्मिक, धार्मिक काव्यरचना करीत. त्यांचा त्यांच्या मनावर प्रभाव होता. चौथ्या वर्गात एका प्रौढ विद्यार्थ्यांने म्हटलेल्या ओळीचा त्यांच्या मनावर खूप प्रभाव

पडल्याचे ना. घं. सांगतात.

“सुंदरा करी रोदना, ‘आला ग हीवाळा हीवाळा
पति लहान मी उपवरा; रडे खळखळा जी ऽ”[५]

अद्यापही या ओळीची पकड त्यांच्या मनावर असल्याचे ‘खूणगाठी’ प्रस्तावनेत ते सांगतात. केशवसुत, बालकवी, गोविंदाग्रज व इतर मराठी कवी त्याचबरोबर ‘ग्रे’, टेनिसन, एलियट या पाश्चात्त्य कवीच्या काव्याची पकड त्यांच्या मनांवर असल्याचे ना. घ. देशपांडे सांगतात. ‘फुले आणि काटे’ या आत्मकथनात्मक पुस्तकात त्यांनी अनेक बालपणीच्या आठवणी सांगितल्या आहेत.

**१.४ परिसर प्रभाव :**

ना. घ. देशपांडे यांचे आजोळ म्हणजे त्यांच्यासाठी ऐनीचे (ऐशोआरामाचे) नंदनवनच होते. त्यांच्या कवितांवर मोहमंत्र फुकणारे खेडेगाव म्हणजे हे शेंदूरजन होय. शेंदूरजनचा परिसर मूळातच निसर्ग सौंदर्याने परिपूर्ण असा आहे. हे गाव जरी लहान असले तरी अनेक पौराणिक दंतकथांनी निसर्ग सौंदर्यांनी समृद्ध होते. म्हणून ना. घं. ना ‘शेंदूरजन’ हे गाव खूप आवडायचे. शेंदूरजन जवळच डांगेच्या जंगलात व अलिकडच्या गावखोरीच्या पूर्वेच्या आंबराईत मोर, कोकीळ हे पक्षी व कधीकधी वाघ ही पाहायला मिळत. एकदा ना. घं. ना व त्यांच्या मित्रांना वाघ दिसल्याचे वर्णन त्याच्या आत्मकथनपर लेखात आले आहे. गावाजवळच उत्तरेला बेलटेकडीवर बेलाची झाडे व हरिणाचे कळप दिसतात. याचा उल्लेख त्यांनी आपल्या आत्मकथनात्मक लेखनात केला आहे.

गावाबाहेर पूर्वेला ‘पाताळगंगा’ नावाचे कुंड आहे. त्यालाच ध्यानाचे स्थान देखील म्हणतात. दगडाच्या चिऱ्यांची एक छपरी आहे. छपरीत शंकर-पार्वतीच्या मिरवणुकीचे चित्र रेखाटले आहे. कुंडाच्या काठाशी मालतीचे वेल आहेत. त्यांची फुले कुंडात व छपरीत पाण्यावर तरंगतात. एकूणच येथचे वातावरण प्रसन्न व सुगंधमय आहे. योगेश्वरीचे पडलेले देऊळ, शिवलिंगाची अनेक देऊळ येथे आहेत. येथे ध्यानासने, पाण्याची पातळी व मालतीचे फुले

यांचा मनोहर मिलाफ झालेला येथे दिसून येतो. पाताळ गंगेचे पाणी या कुंडात येते व येथून सीता न्हाणी नदी निघते. या गावाजवळच 'जागदरी' व 'नागझरी' ही खेडी आहेत. या गावात अनेक दंतकथा प्रचलित आहेत. लहु-कुश येथेच वाल्मिकी आश्रमात होते, अनिरूध्दाला उषेने येथेच योगमायेने आणले होते. अशा दंतकथा ना. घं. नी येथून ऐकल्या आहेत. या गावात व गावाबाहेर अनेक भग्न मूर्ती, भग्न स्तंभ विखुरलेले आहेत. जमिनीत काही मंदिरे गाडली गेल्याचे येथे सांगितल्या जाते.

गावाच्या पश्चिम वेशीच्या आत चार पडक्या भिंतीचे एक देऊळ आहे. त्यांत एक प्रचंड शिवलिंग असून त्या समोर पुरूषभर उंचीचा नंदी आहे. देवतेचे नाव बाणेश्वर असे आहे. तसेच गावच्या उत्तरेला बेलटेकडी आहे. तिच्या तळाशी नदी वाहते. ही नदी एखाद्या कुलीन रमणीसारखी मृदू आवाजात कुजबुजत पुढे-पुढे जाते. अशाप्रकारचे 'शेंदूरजन' हे गाव अंजिठ्याच्या घाटावर आहे. गावचे व आजूबाजूचे वातावरण मनाला मोहित करणारे आहे. त्याचप्रमाणे ना. घं. चे मूळगाव साखरखेर्डा हे देखील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले व निसर्गरम्य वातावरण असलेले ठिकाण आहे. येथे टेकडी, बुरूज व एक मजबूत किल्ला आहे. या गावच्या दक्षिण विभागात एक सुंदर काळ्या पाषाणाची मशीद आहे. तिच्या मागे एक बांधीव तलाव आहे. मशीद ही पूर्वाभिमूख आहे. इतकी सुंदर मशीद विदर्भात फक्त रोहिणखेडला आहे असे म्हणतात. गावाबाहेर दक्षिण भागात एक जंगमाचा मोठा मठ आहे. 'श्री पलसिध्द मठ' असे त्याचे नाव आहे. हा मठ निदान अकराशे वर्षाचा जुना आहे असे येथे सांगितले जाते. गावकोसाच्या उत्तर टोकाला एक छोटा बुरूज आहे याला 'फत्तेबुरूज' म्हणतात. फत्तेबुरूज हे नाव निजामाने आपल्या झालेल्या विजयामुळे इ.स. १७२४ ला दिले. बाजीराव पेशवे, अल्लाउद्दिन खिलजी यांचे लेख येथे सापडतात. अमृतराय कवी या 'साखरखेर्डा' या गावचाच पटवारी होता. अशी माहिती मिळते.

अशाप्रकारच्या पारंपरिक वसा असलेल्या, निसर्गमय वातावरणात ना. घ. देशपांडे यांचे बालपण गेले. त्यांना साखरखेर्ड्यापेक्षा शेंदूरजन अतिशय आवडत असे. याबाबत डॉ. मंदा खांडगे यांनी ना. घं. च्या घेतलेल्या भेटीतील त्यांचेच मत पाहण्यासारखे आहे -

'सेंदूरजनच्या परिसराने माझ्या कवितांवर परिणाम केलाय'[६] असे उत्तर डॉ. मंदा खांडगे यांनी शेंदूरजन बाबत विचारणा केल्यानंतर ना. घं. देतात.

अशाप्रकारे निसर्गरम्य वातावरणाचा तेथील पाषाणी कलाकृतीचा त्यांच्या मनावर परिणाम होऊन त्यातून त्यांची कविता निर्माण झाल्याचे दिसते. 'शीळ' 'नदीकिनारी', 'चुकलेले कोकरू', 'काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे', 'धनगरी गाणे' अशा अनेक कविता परिसर प्रभावातून निर्माण झाल्याचे आपणास सांगता येतील.

## १.५ सांसारिक जीवन :

ना. घं. च्या घरात यावर्षी त्यांचे लग्न करायचे अशी चर्चा असताना १९३५ च्या मार्च मध्ये खामगावचे आबासाहेब एकबोटे आपल्या पुतणीसाठी स्थळ पाहायला मेहेकरला आले. मध्यस्थी माणसाने ती मुलगी ना. घं. व त्यांच्या मामांना दाखविली. त्यांचीच 'शीळ' ही कविता त्या मुलीने अतिशय गोड स्वरांत गाऊन दाखविली. तिचे नाव शांता होते. ना. घं. ना मुलगी पसंत पडली ती विशेष दिसायला गोरी नव्हती मात्र त्यांनी तिचे गोरेपण न बघता तिच्या मनाचे सौंदर्य बघून लग्नाला होकार दिला. १५ मे १९३५ ला त्यांचे लग्न झाले. लग्नात ना. घं. च्या वडिलांना विशेष मान न दिल्यामुळे साखरखेड्याचे लोक नाराज झाले. पण एकदाचं त्याचे लग्न पार पडले. नवऱ्याजवळ बसणे, नवऱ्याशी समक्ष बोलणे हे त्यांच्या घरच्यांना सहसा पटत नव्हते. ना. घं. ना व शांताला येथे बंदिस्तपणासारखे भासू लागले. शेवटी त्यांनी देवदेवतांचे लग्नानंतरचे रितीरिवाज कार्यक्रम आटोपून वकिलीच्या व्यवसायासाठी ते व त्यांची पत्नी त्यांच्या मामांच्या (ना. घं. च्या) गावी मेहेकरला राहायला गेले. तेव्हा त्यांना बंदिस्तपणातून मुक्तता झाल्यासारखे वाटले. तेथे त्यांचे मामा-मामींनी स्वागत केले व येथे ते राहू लागले. नवरा-बायको यांना जे स्वातंत्र्य हवे असते ते सर्व स्वातंत्र्य त्यांना येथे मिळाले व खऱ्या अर्थाने त्यांच्या सांसारिक जीवनाला येथे सुरूवात झाली.

पुढे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला. सुरूवातीच्या काळात त्यांना बऱ्याचशा आर्थिक अडचणी भासत होत्या. मात्र अशावेळीला सौ. शांता त्यांना सांभाळून घेई. तिचे

पतीप्रेम व संसाराबाबत असलेली तिची तळमळ दिसून येते. ना. घं. व त्यांच्या पत्नी खऱ्या अर्थाने येते एकमेकात समरस झाले होते. आनंद त्यांच्या जीवनात दिवसेंदिवस फुलत होता. सामाजिक कार्यात जेव्हा ना.घं. भाग घेत तेव्हा सौ. शांता त्यांना हातभार लावायची. वेडात प्रेम असेल वा नसेल, पण प्रेमात वेड असते याची अनुभूती ते घेत होते. त्यांच्यात निवांत एकांत प्रीतीचा पूर येत होता. उदा. सांगायचे झाल्यास,

एका रात्री अंदाजे दोन वाजता ना. घं. बाहेर येऊन गॅलरीत उभे राहिले. लगेच शांता पाठोपाठ येवून त्यांना मागच्या बाजुने बिलगली. त्यांना एकमेकांना परस्परांचे श्वास ऐकू लागले. त्यांच्या या स्थितीतून 'तुझ्या माझ्यात ग ऽ' या कवितेने जन्म घेतला.

'आज आहे, सखे
निशिगंधात गंध
श्वसनाचा प्रबंध
तुझ्या माझ्यात ग ऽ
आज आल्यात ग ऽ
पावसाच्या सरी
भावनेच्या भरी
तुझ्या माझ्यात, ग ऽ ! (तुझ्या माझ्यात ग ऽ पृ.क्र. २७)

अशाप्रकारची कविता निर्माण झाली व विस्मयाची जागा प्रीतीने घेतली.

कवी ना. घं. व त्यांची पत्नी मेहकरला राहत असताना १ जाने. १९३५ ला त्यांनी वकिली व्यवसाय सुरू केला. मामाच्या घराची समोरची खोली ऑफिससाठी त्यात टेबल, खूर्ची कारकूनला बसायला थोडी जागा ठेवली. अशा प्रकारची तेथे स्थिती होती. ना. घ. देशपांडे यांनी पहिली केस महिपतीची घेतली व मेहनत करून केस जिंकून दाखविली. परंतु केस जिंकल्यावर शिवराम मिस्त्री गायब झाला व त्यामुळे फी मिळण्याची त्यांना आशा उरली नाही. अशावेळेस यश मिळून सुद्धा त्यांच्या पदरी निराशा पडली. मात्र मामा व आजीने केलेले कौतुकाने त्यांचे मन प्रफुल्लित झाले.

१९४१ ला ना. घं. नी आपल्या मामाचे घर सोडले. घर सोडण्यापाठीमागे काही वाद, भांडणतंटा असे काही नव्हते. नंतर त्यांनी मेहेकरलाच तेथील देशमुख सदगृहस्थाची माडी भाड्याने घेतली. तेथपर्यंत त्यांना एक कन्या प्रतिभा व दोन पुत्ररत्न प्रताप व शिवराम झाले होते. माडी प्रशस्त असल्याने राहण्याची उत्तम सोय झाली होती. ना. घं. ना. त्याकाळात ५५ रू. महिना वकिली फी यायची त्यात सर्व उरकावे लागत असे पण अडचणी असून देखील प्रीती असल्यामुळे ते सुखाने जीवन जगू लागले होते. वकिली व्यवसाय करीत असल्यामुळे घरात देखील ते नेहमी कायदेशीर भाषेतच बोलत. परंतू असे असलेतरी कायदेबाजीचे विश्व व कवितेचे विश्व त्यांचे वेगळे असायचे. पैश्यांचा हव्यास त्यांना अजिबात नव्हता. मात्र गरजेपुरती रक्कम आपण तत्परतेने कमवावी, याकडे ते लक्ष देत. त्यांच्या कामातील अचूकपणा पाहून जज्ज लोक देखील त्यांचे कौतुक करीत. ना. घं. उत्तम चित्रकार त्याचबरोबर उत्तम शिंपी (Tailor) देखील होते. त्यांनी आपल्या आईचा त्यांच्या आठवणीच्या आधारे स्केचपेन्सिलने काढलेला फोटो त्यांनी काढलेल्या चित्राचे उत्तम उदाहरण सांगता येईल. कवी ना. घ. देशपांडे व्यावसायिक वकिलांबरोबरच एक प्रामाणिक सल्लागार होते. ते तोलून मापून भाषा वापरीत असत.

आपल्या आईची अहेव नवमी आपण स्वत: करायची असे त्यांनी ठरविल्यावर त्या निश्चित तारखेला त्यांनी आपल्या नातेवाईकांना आपल्या वडिलांना आपल्या खोलीवर बोलावले. त्यांची पत्नी सौ. शांता व कृष्णामावशी सकाळपासून कामात व्यस्त होत्या. रात्री अकराला त्यांचे (ना. घं.) जेवणे उरकली. शांता व कृष्णामावशी त्यानंतर जेवल्या. नंतर ना. घं. व व शांता जेव्हा झोपायला गेले तेव्हा सौ. शांताला दिवसभराच्या श्रमाने झोप येत होती. मात्र ना. घं. ची झोप उडाली होती. अशास्थितीत देखील शांता त्यांच्याशी अधूनमधून बोलत होती. तिचे ना. घं. कडे लक्ष होते. यातून शांताचे ना. घं. वर असलेले गाढ प्रेम दिसून येते. आपुलकी, समरसता तिच्यात ठासून भरलेली दिसते. त्याचबरोबर ना. घं. चे देखील सौ. शांताबाईवर तेवढेच प्रेम होते. त्यांच्या बाबतीत 'Marriage only adjustment' असे अजिबात नव्हते असे म्हणता येईल.

वयानुसार शांतात जो अल्लडपणा हवा, तो तिच्यात असलेला दिसून येतो. ना. घं. जेव्हा आपण तिला एका वेणी घालणाऱ्या बाईला पाहिल्याचा प्रसंग सहजपणे सांगतात तेव्हा सौ. शांता त्यांच्यावर खवळते व म्हणते की,

''तुम्हालाच त्या सटवीकडे पाहावसे वाटले असावे !' 'बदमाश', 'लबाड' अशा अनेक पदव्यांचा माझ्यावर वर्षाव झाला.' शांता एरवी शांत असे पण तिला माझ्या चारित्र्याचा थोडा ही संशय आला तर ती त्यांच्यावर खवळत असे. विशाल सागरासारखा मी मात्र त्या वादळाकडे शांत, सस्मित चंद्रासारखा नुसता पाहत असे.'' ७

अशाप्रकारचे ना. घं. व त्यांच्या पत्नी यांच्यात कौटुंबिक प्रेमाचे नाते निर्माण झाले असून प्रेमातील रूसवा-फुगवा येथे व्यक्त झालेला आहे. ना. घं. च्या पत्नी सौ. शांता यांनी एकदा देवाला कौल लावून 'अभिसार' या काव्यसंग्रहाला पुरस्कार प्राप्त होईल असे आपले मत वर्तविले होते व ते काही महिन्यानंतर खरे ठरले. पण त्या अगोदरच त्यांना पत्नीच्या मृत्यूने तिच्या सहवासाला मुकावे लागले. बँकेजवळ नवीन रूम त्यांनी भाड्याने घेतली होती. त्या रूमवर काही दिवस राहिल्यानंतर एक दिवस डॉ. पु. गो. एकबोटे (सौ. शांताबाई यांचे चुलतभाऊ) व वि. घं. रूमवर आल्यावर सौ. शांता त्यांच्यासाठी चहा करण्यासाठी स्वयंपाक घरात गेली व लगेच काही मिनिटात आरडाओरड सुरू झाली. ना. घं. व सर्व आत जाऊन बघतात तर सौ. शांता आगीने पेटलेली होती. लगेच त्यांना विझवून दवाखान्यात दाखल केले जाते व काही दिवस उपचार झाल्यानंतर तब्येत सुधारत असतांनाच अचानक दि. २४-१-१९६४ ला सौ. शांताबाई यांचा मृत्यू होतो. ना. घ. देशपांडे आपल्या पत्नीच्या जाण्याने हवालदिल होतात. त्यादिवशी रात्रभर ते शांताच्या चिंतनात असतात. त्यांना शांताचा मिळालेला एकोणतीस वर्षाचा सहवास आठवतो. शांताचे सुखदु:खात सामील होण्याचे दिवस त्यांच्या नजरेसमोर सारखे तरळत राहतात व ते सुन्न होऊन बसतात.

वकिलीच्या व्यवसायातून ना. घं. नी बऱ्यापैकी संपत्ती मिळविलेली असते. त्यांच्या साहाय्याने आपल्या चारही मुलांचे ते योग्यपणे पालनपोषण करतात. वयामानानुसार प्रत्येकाचे

लग्न लावून देतात.सर्व व्यवस्थित केल्यानंतर त्यांच्या मनाला समाधान वाटते. आपल्या सहवासात असणाऱ्या प्रत्येकांची आठवण आपल्या आत्मकथनात्मक पुस्तकात आवर्जुन ते करतात. शांताचा सहवास, आजोबा, आजी, आई व नातेवाईक यांना ते कधीही विसरू शकत नाही. याच कालावधीत बऱ्याचवेळा ते आजारी पडतात. त्यांचा नेहमीचा पोटाचा त्रास त्यांना ग्रस्त करतो. तरीपण ते स्वत:ची काळजी घेतात. दवाखान्यात आजारी असल्यावर सुध्दा इतर रूग्ण त्यांना निरोगी समजून त्यांना काम सांगतात. ना.घं. त्याचे कामे नम्रपणे करून त्यांना मदत करतात. दवाखान्यात असताना त्यांना स्वत:विषयीची विस्मयकारी अनुभव येतात. तो अनुभव पुढीलप्रमाणे सांगता येईल.

ना. घ. देशपांडे 'फुले आणि काटे' पुस्तकात सांगतात, 'माझा कॉट नं. २१, वॉर्ड नं. २१, जन्म ता. २१. विस्मय वाटला चॉर्टमध्ये मी ४३ सांगूनही वय माझे २१ मांडले. आणखी २१ आकड्याची किमया दिसली.'[८] अशा प्रकारचा विनोदी किस्सा ते स्वत:बाबतचा सांगतात.

दवाखान्यात भरती असताना त्यांना भितीदायक असे अनुभव येतात. ते सांगतात, जीवन आणि मरण यांत एक सूक्ष्म पडदा आहे. ना. घं. च्या वॉर्डमध्ये त्याच्या बेडजवळील व्यक्ती मृत पावली त्यावेळेला ते तेथेच बेडवर बसून जेवण करत होते. दीड-दीड महिन्यांपर्यंत ते दवाखान्यात राहत. अशातच पुढे आपल्या आजारीपणामुळे व दीर्घ वय झाल्यामुळे दि. १० मे २००० ला त्यांचा मृत्यू झाला. त्यांनी जीवनभर आपल्या सांसारिक जीवनाचा रथ योग्यरित्या ओढला. आपल्या कवितेशी एकनिष्ठता राखली व जातांना आपल्या मुलां-मुलीची योग्य व्यवस्था लावून दिली. त्यांनी सांसारिक म्हणून आपल्या सर्व जबाबदाऱ्या पेलल्याचे आपल्याला दिसून येते.

## १.६ वाङ्‌मयीन जडणघडण :

ना. घ. देशपांडे यांच्या वडिलांना आरत्या, धार्मिक काव्यरचना करण्याचा छंद होता. वडिलांच्या काव्यरचनेचा, तमाशात केलेल्या गाण्याचा व सेंदूरजनला मराठी शिकत असताना प्रौढ विद्यार्थ्यांनि गायलेल्या रचनेचा त्यांच्या मनावर सखोल परिणाम झाला. तसेच १९२९ ला

नागपूरला मॉरिस कॉलेज मध्ये शिकत असताना मित्रांने दिलेल्या आमंत्रणात मिष्टान्न खाल्ल्यानंतर ते धंतोली वरून सीताबर्डीकडे जात होते. पुलांवरून जातांना त्यांचे मन मस्तीत असतांना अवघ्या १०-१५ मिनीटांत 'शीळ' कविता तयार झाली आणि त्यांच्या काव्यलेखनाला येथून सुरवात झाली.

ना. घं. च्या पुढच्या काळात काही मराठी व काही पाश्चात्त्य कवीच्या कवितांचा प्रभाव त्यांच्या मनावर उमटला व त्यातून त्यांची वाङ्मयीन जडणघडण झाली. सुरवातीला त्याच्या काव्यलेखनाचा वाचक त्यांचे भाऊ वि. घ. देशपांडे असायचे ते त्यांच्या कवितेत आवश्यक तेथे सूचना सूचवायचे. ना. घं. चे लग्न झाल्यानंतर त्यांच्या काव्याचे वाचन त्यांची पत्नी सौ. शांता निष्ठेने करीत असे. तिला त्यांच्या कविता अतिशय आवडायच्या. ती ना. घं. ना त्यांच्याच कविता त्यांना गायला लावायची व त्यांच्या ओबडधोबड दबक्या आवाजामुळे ती त्यावर हसत असे. नंतर स्वत: गोड आवाजात गाऊन दाखवायची.

ना. घं. च्या संसारात त्यांच्या अनेक कविता फुलल्या, त्यांच्या प्रेमविषयक, निसर्गविषयक कविता अतोनात सुंदर बनल्या आहेत. त्यांच्या कविता बघून श्री. पु. भागवत यांनी त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित केले. तर श्री. ज. जोशी, गजाननराव वाटवे, सौ. जोत्स्ना भोळे यांनी त्यांची बऱ्याचशा कविता ध्वनिमुद्रीत करून गोड चालीवर गाणी बनविली. एकदा कवी असेच रस्त्यावरून जात असताना त्यांना एका पानटपरीवर त्यांची ध्वनिमुद्रीत केलेली कविता ऐकायला मिळाली, तेव्हा ना. घं. मनापासून हर्षोल्हसित होतात. त्यांना खऱ्या स्वरूपात आपली लोकप्रियता कळते. त्यांनी आपल्या कविता अनुभूतीतून लिहिल्या. त्यामध्ये कल्पनात्मकता नाही. जीवनाच्या उत्तरार्धात त्यांची पत्नी सौ. शांताबाई निवर्तल्यावर देखील आपले काव्यलेखन थांबवले नाही. त्यांनी आपल्या आयुष्यभर काव्य या प्रकाराला महत्त्व दिले. त्यांनी 'शीळ', 'अभिसार', 'खूणगाठी', 'कंचनीचा महाल' व 'गुंफण' अशी एकूण पाच काव्यसंग्रह व 'फुले आणि काटे' हे कवितेची माहिती देणारे व त्यांच्या जीवनाचा आलेख मांडणारे आत्मकथन प्रकाशित केले आहे.

सुरूवातीच्या काळात ना. घं. आपल्या कविता जाती व वृत्ते यामध्ये करत नंतर लघुगुरू भेदातील छंदातील कविता करू लागले. कवितांची ही माध्यमे कवी मुख्यत: आतून येणाऱ्या लयीनुसार घेत असत. त्यांची 'मालन'ही कविता लघुगुरू भेदातील छंदात आहे. पुढच्या काळात 'कंचनीचा महाल' ही दीर्घ कविता लघुगुरू भेदातील आहे. ती त्र्यक्षरी गणी छंदात आहे. ना. घं. नी आपल्या उत्तरार्धात काही गझल व रूबायती लिहिल्या. त्यांच्या 'आज जाऊ दूर रानी' 'अंतराच्या गूढ गर्भी' या व इतर बऱ्याचशा कवितेत गझलांची वृत्ते आहेत. 'माझी गाणी' मध्ये रूबायती आहेत 'नि:श्वास गीतावली' ही कविता सुमंदारमाला वृत्तांत आहे.

ना. घ. देशपांडे स्वत: प्रसिध्दीपराङ्मुख असल्याचे बोलले जायचे, ते सत्य आहे. त्यांना आपली खूप प्रसिध्दी व्हावी, आपली स्तुती व्हावी असे त्यांना कधीही वाटत नव्हते. अशी सच्छील वृत्ती त्यांच्या अंगी होती. स्त्रीला कवी सृजनाची महत शक्ती मानतात व तिच्यावर कविता करतात. त्यांची स्त्रीवर बहुतांश कविता लिहिलेल्या आहेत असे दिसते. त्यांच्या जीवनविषयक कविता खऱ्या अर्थाने जीवनाचा आलेख मांडते. अशाप्रकारे जीवनाच्या उत्तरार्धात त्यांचे काव्यविश्व विस्तारीत गेले. दि. ६ ऑक्टो. १९८५ ला मुंबई दूरदर्शनवर 'प्रतिमा व प्रतिभा' हा ना. घं. विषयी कार्यक्रम झाला. त्यात 'शीळ' कविता गायल्या गेली. नागपूरला उगम पावलेली त्यांची 'शीळ' कविता गोवा ते ग्वाल्हेर पर्यंत जाऊन पोहचली. कवी ग. ल. ठोकळ यांनी जानपदगीतांचा 'सुगी हा काव्यसंग्रह (१९३३) प्रकाशित केला. त्यांत त्यांनी ना. घ. देशपांडे यांच्या पाच कवितांचा त्यात समावेश केला. हा त्यांच्या काव्याचा केलेला एक सन्मानच होता. १९३६ ला कै. विष्णु देशपांडे व कै. भावे यांनी 'स्वच्छंद' नावाचे एक नियतकालिक काढले त्यात ना. घं. च्या कविता छापून आल्यात. त्याला वाचकांनी चांगला प्रतिसाद दिला. 'स्वच्छंद' हे नियतकालिक बंद पडल्यानंतर 'सावधान' हे नियतकालिक सुरू झाले. त्यामध्ये ना. घं. आपल्या कविता पाठवू लागले. त्या कविताना वाचकांनी चांगला प्रतिसाद दिला. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात उदासिन, घायाळ झालेल्या लोकांचे स्फुल्लिंग पेटून उठावेत. त्यांनी स्वत: शूरत्व धारण करावे म्हणून 'आर्यांचे गाणे' ही कविता त्यांनी लिहिली. स्वातंत्र्य संग्रामासाठी त्यांनी सुरूवातीच्या काळात काही लेखनसुध्दा केले असे दिसते.

कवी ना. घ. देशपांडे काव्यलेखन चांगले करीत असले तरी त्यांनी योग्य चाली वगैरे देऊन त्यांना त्या गाता येत नसत. त्यांचा आवाज ही त्याला साजेशा असा नव्हता. त्यामुळे कविसंमेलनात कवी आपली कविता सरळधोपपणे वाचून दाखवत. कविता मात्र त्यांची चांगली असायची. परंतु त्या काळात काव्यगायनावर जास्त भर असल्यामुळे कवीला तेथे रसिकांपासून निराशा प्राप्त होत असे. मुंबई, मध्यप्रदेश, दिल्ली येथून त्यांना कविसंमेलनासाठी सारखी पत्र यायची. ना. घं. ना गायनाचे अंग नसले तरी चोरासारखे कविसंमेलनात भाग घ्यायचेच. ते १९४५ च्या सुमारास येणाऱ्या नवकवितेचा विरोध करीत नसत. पण आपली एक विशिष्ट काव्यशैली मात्र ते जपत असत. आपल्या काव्यात प्रतिमेचा अतिरेकी वापर तर होत नाही ना ? याकडे पण त्यांचे विशेष लक्ष असायचे. अशाप्रकारची सतर्कता ते काव्यलेखनात बाळगत असत.

ना. घ. देशपांडे यांच्या 'अभिसार' या काव्यसंग्रहाला 'अनंत काणेकर पुरस्कार' मिळाला तर 'खूणगाठी' या काव्यसंग्रहास 'साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला. 'शीळ' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह त्या काळात व आज ही रसिक वाचकांस प्रिय वाटतो. 'कंचनीचा महाल' व 'गुंफण' हे काव्यसंग्रह वाचकास गुंगवून सोडतात. त्यांच्या कवितांचे गुढ सांगणारे व त्यांच्या जीवनाचे आलेख मांडणारे 'फुले आणि काटे' हे आत्मकथनात्मक लेखाचे पुस्तक वाचण्याजोगे बनले आहे. ना. घं. नी आयुष्यभर काव्यलेखन करून काव्य प्रकाराला समृद्धी प्राप्त करून देण्याचे कार्य केले. त्याचेच श्रेय म्हणजे १९७४ ला ३५ व्या विदर्भ साहित्य संमेलनाचे ते 'अध्यक्ष' बनले. या संमेलनाचे अध्यक्ष पद हा त्याचा योग्य सन्मान आपणाला म्हणावा लागेल.

## ०२ समारोप :

अशाप्रकारे ना. घ. देशपांडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा परिचय झाल्यानंतर आपणास त्यांच्या 'शीळ' व 'कंचनीचा महाल' या काव्यसंग्रहाचे विशेष पुढे पहावयाचे आहे.

# संदर्भग्रंथ सूची


| | | |
|---|---|---|
| १) | शेळके शांता | प्रस्तावना, 'सांजेचा फुलबहार'<br>'फुले आणि काटे' ना. घ. देशपांडे<br>मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९९०.<br>पृ.क्र. १२ |
| २) | देशपांडे ना. घ. | प्रस्तावना<br>'खूणगाठी' काव्यसंग्रह<br>मौज प्रकाशन, मुंबई प्र. आ. १९८५<br>पृ. क्र. १२ |
| ३) | तत्रैव | पृ. क्र. ९ |
| ४) | देशपांडे ना. घ. | प्रस्तावना<br>'खूणगाठी' काव्यसंग्रह<br>मौज प्रकाशन, मुंबई प्र. आ. १९८५<br>पृ. क. १५ |
| ५) | तत्रैव | पृ.क्र. १३ |
| ६) | डॉ. खांडगे मंदा | 'कवीच्या गावा जावे'<br>प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००१<br>पृ.क्र. १०२ |
| ७) | देशपांडे ना. घ. | 'फुले आणि काटे'<br>मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, प्र.आ. १९९०<br>पृ.क्र. १६४ |
| ८) | तत्रैव | पृ.क्र. १८६ |

# प्रकरण दुसरे
# ‘ शीळ ’ मधील कवितांचे स्वरुप


०१. प्रास्ताविक

०२. प्रेमकविता

०३. ‘शीळ’ मधील निसर्गकविता

०४. जीवनविषयक कविता

०५. कौटुंबिक कविता

०६. गूढगुंजनपर कविता

०७. जानपद कविता

०८. ‘शीळ’ मधील गझल

०९. आध्यात्मिक कविता

१०. सामाजिक कविता

११. ‘शीळ’ काव्यसंग्रहातील स्त्री प्रतिमा

१२. ‘शीळ’ काव्यसंग्रहाचे रचनावैशिष्ट्ये

१३. समारोप

संदर्भ ग्रंथ